# सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, नाशिक

डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, नाशिक-पुणे रोड, नाशिक ४२२ ०११

ई-मेल dswonashik@gmail.com दुरध्वनी ०२५३-२२३६०५९


जा.क्र. सआसकना/ भासशि/दोनवेळाअनुत्तीर्ण/272/२०१८-१९, नाशिक, दिनांक २४/०१/२०१९

**परीपत्रक-महत्वाचे**

प्रति,
प्राचार्य,
सर्व व्यवसायिक महाविद्यालये,
जिल्हा नाशिक

विषय :- दोन किंवा दोन पेक्षा जास्त वेळा अनुत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक शुल्काची प्रतिपूर्ती न करणेबाबत

संदर्भ:-1. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाचे शासन निर्णय क्र. ईबीसी -2016/प्र.क्र. 221 /शिक्षण-1दि.31 मार्च 2016.

2. समाज कल्याण आयुक्तालयाचे परीपत्रक क्र. 549 दि. 04.03.2017

आपले लक्ष संदर्भिय शासन निर्णय क्र. 1 मधील अटी व शर्ती मधील क्र. 13 कडे वेधण्यात येत आहे. सदर अटीमध्ये नमुद असल्याप्रमाणे सन 2015-16 या वर्षापासून प्रवेशित विद्यार्थ्याने अभ्यासक्रमास प्रवेश घेतल्यानंतर संपूर्ण अभ्यासक्रमाच्या एकूण कालावधीत दोन किंवा त्यापेक्षा अधिक वेळा पूर्णत: अनुतीर्ण झाल्यास संबधित विद्यार्थी अभ्यासक्रमाच्या उर्वरित कालावधीसाठी शिक्षण शुल्क परीक्षा शुल्क प्रतिपूर्ती योजनेसाठी कायमस्वरुपी अपात्र ठरेल.

त्याअनुषंगाने आपणांस कळविणेत येते की, विद्यार्थ्याचे गुणत्रक हे महाविद्यालय सूतरावरती असल्यामुळे व विविध वृयवसायिक अभ्यासक्रमांसाठी उत्तीर्ण ठरण्याचे निकष वेगवेगळे असते व त्याची संपूर्ण माहिती हि संबधित महाविद्यालयास असते, त्यामुळे सदर अटीनुसार अपात्र ठरत असलेल्या उपरोक्त प्रमाणे अपात्र ठरलेल्या विद्यार्थ्यांनी महा-डिबीटी पोर्टलवर अर्ज भरल्यास ते आपल्या स्तरावरुनच रद्द करण्यात यावे. असे अपात्र अर्ज आपल्यामार्फत या कार्यालयाकडे ऑनलाईन प्रणालीव्दारे सादर केल्यास, व तो अर्ज चुकीने मंजूर झाल्यास त्याबाबत सर्वस्वी जबाबदारी आपली राहील याची नोंद घ्यावी.

सोबत : संदर्भ क्र.1 व 2 चे पत्र

(प्राची वाजे)
**सहाय्यक आयुक्त,**
**समाज कल्याण, नाशिक**